महत्वाचे

जा.क्र.उमाशि-२/११ वी ऑनलाईनप्रवेश/पुवि/२०१४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : १७/६/२०१४
17 JUN 2014

प्रति

सर्व मुख्याध्यापक
माध्यमिक शाळा
पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसर, पुणे

विषय : इ. ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत.
प्रवेश पुस्तिका वितरणबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांक ९८१९-२२ दिनांक ५/५/२०१४ चे पत्र

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्रानुसार आपणास कळविण्यात आल्याप्रमाणे केंद्रशाळांमार्फत व संपर्क शाळांमार्फत आपण मागणी नोंदविल्याप्रमाणे आपणास इ. ११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिका विदयार्थ्यांना देण्यात आलेल्या होत्या. ज्या शाळेत शिल्लक राहीलेल्या २ पेक्षा अधिक इ. ११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिका परत मुख्य केंद्र प्रमुखांकडे दिनांक ९/५/२०१४ अखेर जमा करणबाबत आपणास कळविण्यात आलेले होते. अशा सर्व पुस्तिका मुख्य केंद्रप्रमुखांकडे जमा कराव्यात अन्यथा शिल्लक असलेल्या माहिती पुस्तिका ची किंमत भरणा करण्याबाबतही कळविले होते.

**तथापि या पत्राद्वारे कळविण्यात येते की, आपणाकडे शिल्लक राहीलेल्या इ. ११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिका तातडीने सर्व संपर्क शाळांमार्फत मुख्य केंद्रांकडे दिनांक १८/६/२०१४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करण्यात याव्यात याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

सर्व केंद्र प्रमूखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, वरील प्रमाणे आपल्या सर्व संपर्क शाळांप्रमुखांना पून्हा त्याप्रमाणे सूचना देवून इ. ११ वी ऑनलाईन माहिती पुस्तिका आपल्याकडे जमा करुन संबंधित शाळांना पोहोच देण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच पुस्तिका वितरणाचा तपशील व जमा केलेल्या रकमांचा तपशील दिनांकनिहाय तयार करुन ठेवावा. तसेच आपल्या तीनही केंद्रांकडून महाराष्ट्र बोर्डा व्यतिरिक्त तसेच ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत समाविष्ठ नसलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विक्री केलेले पुस्तिकांचा हिशोब तयार ठेवावा.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

१७/६/१४
(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत - माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. श्रीमती तिलोत्तमा रेड्डी
मुख्याध्यापिका, अहिल्यादेवी हायस्कूल, शनिवार पेठ, पुणे
२. श्रीमती अनिता साळुंखे,
मुख्याध्यापिका, आंबेडकर विद्यालय, कॅम्प पुणे
३. श्री मिश्रा आर. आर.
मुख्याध्यापक, गोदावरी हिंदी विद्यालय, चिंचवड, पुणे